भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.६००/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०८/२०१७

**१) महिलेला शारीरीक व मानसिक त्रास देवुन हुंडयाची मागणी केल्याने गुन्हा नोंद:–**

दि. ०६/०४/२०१७ ते दि. २३/०८/२०१७ पर्यंत यातील फिर्यादीचे लग्न दिनांक १६/०२/२०१७ रोजी आरोपी क्र. १ सोबत जातीरीवाजा प्रमाणे लग्न झाले तेव्हा पासुन घटना तारखेपर्यंत फिर्यादीला चांगली वागणुक दिली व दि. ०६/०४/२०१७ पासुन आरोपी क्र. १ हा फिर्यादीला तु आपले आई –वडीलांकडुन जनरल स्टोअर्स ची दुकाण लावण्याकरीता ७ लाख रूपये व एक मोटार सायकल आण असे नेहमी बोलुन थापड बुक्यांनी मारपीट करीत असतांनी आरोपी क्र. २ ते ४ हे आरोपी क्र. १ यास प्रोत्साहन देवुन फिर्यादीला नेहमी शारीरीक व मानसीक त्रास देवुन मारपीट करीत असल्याने फिर्यादीने दि. १२/०७/२०१७ रोजी प्रगती कौटुंबीक सल्ला केद्र लाखनी येथे तक्रार केली होती परंतु आरोपी १ ते ४ हे हजर न झाल्याने त्यानी पो.स्टे ला तक्रार करण्या बाबत लेखी अभिप्राय दिल्याने फिर्यादीचे लेखी व प्रगती कौटुंबीक सल्ला केद्र यांचे लेखी अभिप्राया वरून पो.स्टे. लाखनी येथे कलम ४९८(अ),३४ भांदवि सहकल ३,४ हुंडा प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढिल तपास पोना. हेमने पो.स्टे लाखनी हे करीत आहेत

**२) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २४/०८/२०१७ चे २३.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हीला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेंभुर्णे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**३) सोन्याच्या दागीण्याची चोरी :–**

दिनांक २४/०८/२०१७ चे १०.०० वा. ते १८.०० वा. दर. यातील संशयीत आरोपीने कोणी नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घराचे मागील दाराची कडी काढुन आत प्रवेश करून खोलीत भिती मध्ये असलेल्या कपाटाच्या कोंडा तोडुन कपाटात ठेवलेल्या स्टिलच्या डब्यातील एक सोन्याची नथ ३ ग्रॅम,एक सोन्याची नथ २ ग्रॅम, व नगदी २५००–/रु. असा एकुण १७५००/–रु. माल चोरून नेल्याने फिर्यादी सौ. सत्यभामा सखाराम गायधने वय ५५ वर्ष रा. जैतपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४५४,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. कठाणे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**४) बांधकामाच्या साहित्याची चोरी . :–**

दिनांक २४/०८/२०१७ चे २२.०० वा. दर. यातील फिर्यादी संदीप दामाजी पाटील वय ४० वर्ष रा. ३ ईयर चंद्रमणी नगर नागपुर हा सिव्हील इंजीनीयरींगचे काम पाहत असल्याने चांदमारा रोडवरील क्वार्टरचे बांधकामाच्या ठिकाणी ठेवलेले क्वॉर्टर क्रमांक ०९ मध्ये सामान लोखंडी सेंट्रीग प्लेट २० नग, लोखंडी जाक पाईप २५ नग असे एकुण २७,७५०/– रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोराने कोणी नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा लिल्हारे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

५) हद्दपारीचे आदेशाचे उल्लघंन केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २४/०८/२०१७ चे २३.४५ ते २५/०८/२०१७ चे ००.३० वा. दर. यातील आरोपी हा मा. उपविभागीय दंडाधिकारी सा. तुमसर यांचे हददपारीचे आदेशाचे उल्लघंन करुन बावनकर चौक तुमसर येथे मिळुन आल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १४२ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हसकर पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) एटीएम मधुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १८/०८/२०१७ चे २२.०२ वा. दर. यातील अज्ञात आरोपीने फिर्यादी चे बॅक ऑफ बडोदा शाखा तुमसर वरुन ३५,२३९/–रुपये २५ पैश्याची फसवणुक करुन काढले असल्याचे मॅसेज प्राप्त झाल्याने फिर्यादी नितीन पांढुरंगजी बांगडकर वय ४६ वर्ष, रा. रामकृष्ण नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(ड) मा.तं.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. कंकाळे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

७) बैलबंडीचे भाडयाचे पैसे देण्याच्या कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन लाकडी पाटीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २४/०८/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी चा जखमी पती यादोवराव झिबल दिघोरे वय ५० वर्ष, हा आपले घरासमोर अंगणात हजर असता यातील आरोपी हा त्याचे घरासमोरील संतोष तुकाराम नखाते यांचे पानठेल्यात दिसल्याने फिर्यादीच्या पतीने त्यास बैलबंडीचे भाडयाचे पैसे दे असे बोलला असता आरोपीने फिर्यादीचे पतीला शिवीगाळ व भांडण करुन डोक्यावर खर्रा घोटण्याच्या पाटीने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. शेंडे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

८) जुणे भांडणावरुन दगडी चिप मारुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २४/०८/२०१७ चे २२.०० वा. दर. यातील फिर्यादी हा सब्जीमंडी दुकान बंद असल्याने घरी परत जात असतांनी यातील आरोपीने जुणे भांडणा वरुन फिर्यादीस एकटे पाहुण भांडण करुन त्यास दगडी चिप उचलुन त्याचे डावे डोळयाचे खाली व डोक्याचे डावे बाजुला मारुन जखमी केले व शिवीगाळ करुन जिवाने मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सुमित बाजा मेश्राम वय ३३ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड एजन्सी जवळ भंडारा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

९) मोटार सायकलच्या धडकेत चिमुरडा जखमी :–

दिनांक २४/०८/२०१७ चे ९.३० वा. दर. यातील फिर्यादी आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने निष्काळजीपणे चालवुन अंगणात खेळत असलेला मुलगा नयनीत विशाल वैद्य वय १.५ वर्ष, यास धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी पुरुषोत्तम अंतुजी वैद्य वय ६३ वर्ष, रा. गोपेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

१०) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिनांक २५/०८/२०१७ चे १५.०० वा. दर. यातील मृतक गजानन बिसन मेश्राम वय ३० वर्ष, रा. ईटान ने आपले स्वत:चे घरी कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने तो उल्टया करीत असता त्यास औषधोपचारा करीता ग्रा. रु. लाखांदुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ मेमो व फिर्यादी प्रमोद बिसन मेश्राम वय २६ वर्ष, रा. ईटान यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नेवारे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**११) मरण पावलेल्या स्थितीत इसम मिळुन आला. :—**

दिनांक २५/०८/२०१७ चे ७.०० ते १३.०० वा. दर. यातील मृतक अंबादास ईश्वर बंगर वय ४५ वर्ष, रा. चिखमाळा जि. चंद्रपुर हा दिनांक २४/०८/२०१७ रोजी निलज फाटा गावी एकटाच गावी दारु पिवुन फिरत असतांना गावातील लोकांनी पाहीले आज रोजी मृतक हा फिर्यादीचे भाऊ फिरोज मुजफ्फर बेग यास दारु पाणीपिलेल्या स्थितीत जिलानी मज्जीद समोर सकाळी ७.०० वा. सुमारास रेतीवर बसला दिसला होता. १३.०० वा. दरम्यान फिर्यादी व त्याचे समाजातील लोक जिलानी मज्जीद येथे नमाज पठन करण्यास गेले असतांना १३.०० वा. दरम्यान मृतक हा मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आला मृतकाची ओळख त्याचे नातेवाईकाकडुन पटली असुन मृतक हा अचानक मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादी फिरदोस मुजफ्फर बेग वय ३० वर्ष, रा. निलज फाटा याचें रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**१२) सर्पदंशाने इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २५/०८/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादीचा पुतण्या मृतक विलास मनोहर गोपाले वय ३८ वर्ष, रा. लव्हारी हा शेतावर धानाला खत मारण्याकरीता गेला असता कोणत्यातरी विषारी सापाने उजवे पायाचे पोटरीजवळ चावा घेतल्याने त्यास औषधोपचारा करीता उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो व फिर्यादी किशन मधुकर गौपाले वय ६२ वर्ष, रा. लव्हारी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मडावी पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**१३) घराची भिंत पडुन महिलेचा मृत्यु . :—**

दिनांक २५/०८/२०१७ चे ०७.३० वा. दर. यातील मृतक मिरा बाबुराव बोन्द्रे वय ६५ वर्ष, रा. विहीरगाव ही स्वत:चे घराचे बाहेर जुण्या भिंतीचे बाजुला तोंड घासीत बसली असतांना एकाकी भिंत तिचे अंगावर पडुन दबुन मरण पावल्याने तिचे मरणास कोणताच संशय नसल्याने फिर्यादी शामु शामराव बोन्द्रे वय ४० वर्ष, रा. विहीरगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**१०) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक २५/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे मोहाडी साकोली पवनी व लाखांदुर येथे दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १०७ लिटर हातभटटी दारु किंमती १०,७००/—रु. तसेच ४६ लिटर ६२० मिली लिटर देशी दारु किंमती १३,३८२/—रु. असा एकुण किमती २४०८२/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २५/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली अवैध प्रवासी ०१ असून तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०६ केसेस करण्यात आलेल्या आहे.

26.8

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता